# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## पुणे वृत्तांत
### वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 05.04.2025** **वार-शनिवार**

---

**धर्मादाय व्यवस्था ऑनलाइन**

राज्यातील धर्मदाय व्यवस्था ही ऑनलाईन एका प्लॅटफॉर्मवर आणण्यात येणार असून ही व्यवस्था मुख्यमंत्री आरोग्य कक्षाशीही जोडली जाणार आहे. जेणेकरून कुठे खाटा उपलब्ध आहेत, किती उपलब्ध आहेत याची माहिती त्वरित मिळेल. यामुळे भविष्यात रुग्णाला उपचार नाकारले जाणार नाहीत  अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पुण्यात पत्रकारांशी बोलताना दिली. दीनानाथ मंगेशकर रुग्णालयामध्ये उपचार नाकारल्याने एका गर्भवती महिलेचा मृत्यू झाल्याप्रकरणी त्यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला.  यासंदर्भात धर्मदाय आयुक्तालयाच्या अधिकाऱ्यांच्या अधिकार कक्षा वाढवल्या असल्या तरी आगामी अधिवेशनात कायद्यात बदल करण्यात येईल असं नमूद करत मुख्यमंत्री म्हणाले की, या प्रकरणी जे दोषी आहेत त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येईल. यावेळी मृत महिलेच्या कुटुंबीयांनी मुख्यमंत्र्यांची भेट घेतली.

**अंगणवाडी भरती**

पुणे  जिल्ह्यात सुरू असलेल्या अंगणवाडी सेविका आणि मदतनीस भरती प्रक्रियेतील बावीस प्रकल्पांपैकी तीन प्रकल्पांमधील प्रक्रिया पूर्ण झाली आहे. इतर प्रकल्पांची भरती प्रक्रिया ही 15 एप्रिल पर्यंत पूर्ण करून सर्व सेविका आणि मदतनीस मे महिन्यात रुजू होतील. त्यानंतर एकत्रितपणे सर्वांचे प्रशिक्षण होईल.

अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांच्या पुढील भरतीसाठी जिल्हा परिषद स्तरावर ऑनलाइन प्रक्रिया राबविली जाणार आहे. त्यासाठी आत्तापासूनच तयारीला सुरुवात केली असल्याचं पुणे  जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी जामसिंग गिरासे यांनी  सांगितले.

**पीक नुकसान**

पुणे  जिल्ह्यात दोन दिवस झालेल्या अवकाळी पावसामुळे सुमारे शंभर हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज कृषी विभागाकडून व्यक्त करण्यात आला आहे.  यामध्ये प्रामुख्याने कांदा, भाजीपाला, गहू यांसह फळबागांचे नुकसान झाले आहे. नुकसान झालेल्या भागात तातडीने पंचनामे करण्यात येणार असल्याचे कृषी विभागाचे जिल्हा अधिक्षक संजय काचोळे यांनी सांगितले.

**वायु प्रदूषण**

पुणे शहरातील वाढते वायू प्रदूषण रोखण्यासाठी पुणे महापालिकेकडून फॉग कॅनॉन मशीनचा वापर करण्यात येणार आहे. केंद्र सरकारच्या नॅशनल क्लीन एअर प्रोग्राम अंतर्गत 15 व्या वित्त आयोगातून प्राप्त निधीतून महापालिकेच्या ताफ्यात पाच फॉग कॅनॉन मशीन दाखल झाल्या आहेत. हवा प्रदूषणात असलेले धूलिकणांचे प्रमाण कमी करण्यासाठी या मशीनचा उपयोग केला जाणार आहे.

**रेड झोन**

संरक्षण विभागाची रेड झोनची निश्चित हद्द सर्वेक्षण करून पुणे महापालिकेस नकाशे उपलब्ध करून द्यावेत, अशी मागणी महापालिका प्रशासनाने संरक्षण विभागाकडे केली आहे. संरक्षण विभागाच्या आस्थापनांच्या सुरक्षेसाठी त्यांच्या 50 ते 100 मीटर परिसरात बांधकामांना बंदी घालण्यात आली आहे. मात्र, हे क्षेत्र नेमके कोणते याची स्पष्टता संरक्षण विभागाकडून देण्यात आलेली नाही. त्यामुळे या परिसरातील जागा मालकांना बांधकामे करताना अडचणी येत आहेत.

**मलनिःसारण वाहने**

महाराष्ट्र शासनाच्या नगर परिषद संचालनालयामार्फत पिंपरी चिंचवड महापालिकेस 8 टन आणि 18 टन क्षमतेची दोन अत्याधुनिक रीसायकल वाहने मोफत स्वरूपात उपलब्ध करून देण्यात आली आहेत. पिंपरी चिंचवड महापालिका क्षेत्रातील मलनिःसारण व्यवस्थेची कार्यक्षमता आणि प्रतिबंधात्मक साफसफाई अधिक प्रभावी करण्याच्या दृष्टीने ही वाहने महत्वपुर्ण ठरणार आहेत. सध्या महापालिकेमार्फत ठेकेदारांच्या माध्यमातून आठ रिसायकल गाड्या कार्यरत आहेत.

**वारसा दर्शन**

पुण्यातील  सिम्बायोसिस विद्यापीठातील डॉक्टर  बाबासाहेब आंबेडकर संग्रहालयात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीनिमित्त रविवारी सकाळी साडेनऊ वाजता वारसा दर्शन कार्यक्रम होईल. सिम्बायोसिस संस्थेने निर्माण केलेल्या जागतिक दर्जाच्या या संग्रहालयात डॉक्टर आंबेडकर यांच्या दैनंदिन वापरातील वस्तू, पुरस्कार आदि गोष्टी नागरिकांना पाहायला  मिळणार आहे.  तसंच त्यांच्या देदीप्यमान वाटचालीतील महत्त्वाची छायाचित्रे पाहायला मिळतील. या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे  एआय या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून डॉक्टर आंबेडकर स्वतः आपल्याला प्रश्नांची उत्तरे देणार असल्याचा अनुभव घेता  येणार आहे.

**भारती विद्यापीठ चर्चासत्र**

भारती विद्यापीठाच्या धनकवडी शैक्षणिक संकुलातील हॉटेल मॅनेजमेंट विभागातर्फे "एक्सप्लोरिंग निश हॉस्पिटॅलिटी सेगमेंट्स" हे एक दिवसीय चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. या चर्चासत्राचा उद्देश हॉटेल व्यवस्थापन क्षेत्रातील वेगाने विकसित होत असलेल्या उद्योगातील नव्या ट्रेंड्सबाबत जागरूकता निर्माण करणे हा होता.

**निकमार विद्यापीठ**
बांधकाम क्षेत्र भारताच्या आर्थिक विकासाचा एक महत्वाचा आधारस्तंभ म्हणून उदयास येत असून जीडीपी आणि रोजगारात महत्वपूर्ण योगदान देत असल्याचं मत लार्सन अँड टुब्रोचे कार्यकारी उपाध्यक्ष  डॉ.सी. जयकुमार यांनी व्यक्त केले. पुण्यातील निकमार विद्यापीठाने आयोजित केलेल्या एक दिवसीय ‘एचआर समिट 2025’ च्या उद्घाटन प्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**